सकाळ

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

## शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांची माहिती

▸ सकाळ वृत्तसेवा




कोल्हापूर, ता. ४ : वाठार (ता. हातकणंगले) येथील अशोकराव माने पॉलिटेक्निक येथे ६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत सुवर्णमहोत्सवी जिल्हास्तरीय विज्ञान व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनास सर्व शाळा, शिक्षकांसह पालकांनी भेट द्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर (माध्यमिक) यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांतर्गत सोमवारी (ता. ६) १ वाजून ३० मिनिटांनी ग्रंथ प्रदर्शनाचे तर दुपारी २ वाजता विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. मंगळवारी (ता. ७) सहा गटातील स्पर्धकांच्या प्रदर्शनाचे निरीक्षण आणि मूल्यमापन होणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० ते १ या सत्रात 'संशोधक घडताना' या विषयावर डॉ. श्रेयश माणगावे (आयशर, पुणे) यांचे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान होणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील विज्ञान विषय शिक्षकांसाठी अ. ल. देशमुख (भारती विद्यापीठ पुणे) यांचे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व विज्ञान शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमाचा समारोप बुधवारी (ता. ८) दुपारी २ वाजता पारितोषिक वितरणाने होणार आहे.

Kolhapur, Main
05/02/2023 Page No. 2

चंद्रदीप नरके यांनी केले

तरुण भारत

# वाठार तर्फ वडगाव येथे सुवर्णमहोत्सवी विज्ञान प्रदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

जिल्हा परिषदं शिक्षण विभागामार्फत अशोकराव माने पॉलिटेक्निक वाठार तर्फ वडगाव येथे सोमवार ते बुधवार (६ ते ८ जानेवारी) पर्यंत सुवर्ण महोत्सवी भव्य जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन आणि ग्रंथ प्रदर्शनचे आयोजन केले आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी दिली.

जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांतर्गत सोमवारी १ वाजून ३० मिनिटांनी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन व दुपारी २ वाजता विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. मंगळवारी सहागटातील स्पर्धकांच्या प्रदर्शनाचे निरीक्षण आणि मूल्यमापन होणार आहे. सकाळी १० ते १ या सत्रात 'संशोधक घडताना' या विषयावर डॉ. श्रेयश मानगावे (आयशर पुणे) यांचे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान होणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील विज्ञान विषय शिक्षकांसाठी अ. ल. देशमुख (भारती विद्यापीठ पुणे) यांचे 'राष्ट्रीय

- माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांची माहिती
- अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान आयोजन



शैक्षणिक धोरण २०२०' व 'विज्ञान शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. बुधवारी दुपारी २ वाजता पारितोषिक वितरण समारंभानंतर प्रदर्शनाची सांगता होईल. या शैक्षणिक उपक्रमाचा जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यां, पालक व शिक्षक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आंबोकर यांनी केले.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

सकाळ

## शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांची माहिती

▸ सकाळ वृत्तसेवा




कोल्हापूर, ता. ४ : वाठार (ता. हातकणंगले) येथील अशोकराव माने पॉलिटेक्निक येथे ६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत सुवर्णमहोत्सवी जिल्हास्तरीय विज्ञान व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनास सर्व शाळा, शिक्षकांसह पालकांनी भेट द्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर (माध्यमिक) यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांतर्गत सोमवारी (ता. ६) १ वाजून ३० मिनिटांनी ग्रंथ प्रदर्शनाचे तर दुपारी २ वाजता विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. मंगळवारी (ता. ७) सहा गटातील स्पर्धकांच्या प्रदर्शनाचे निरीक्षण आणि मूल्यमापन होणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० ते १ या सत्रात 'संशोधक घडताना' या विषयावर डॉ. श्रेयश माणगावे (आयशर, पुणे) यांचे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान होणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील विज्ञान विषय शिक्षकांसाठी अ. ल. देशमुख (भारती विद्यापीठ पुणे) यांचे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व विज्ञान शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमाचा समारोप बुधवारी (ता. ८) दुपारी २ वाजता पारितोषिक वितरणाने होणार आहे.

पुढारी

# वाठारला उद्यापासून जिल्हा परिषदेचे विज्ञान व ग्रंथ प्रदर्शन



**कोल्हापूर :** जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सोमवार (दि.६) पासून वाठार तर्फ वडगाव येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये विज्ञान प्रदर्शन व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे यावर्षी सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. बुधवार (दि. ८ फेब्रुवारी) पर्यंत हे प्रदर्शन चालणार आहे. सोमवारी दुपारी दीड वाजता ग्रंथ प्रदर्शनाचे व दुपारी २ वाजता विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. मंगळवार (दि.७) सहा गटातील स्पर्धकांच्या प्रदर्शनाचे निरीक्षण आणि मूल्यमापन होणार असून सकाळी १० ते दुपारी १ या सत्रात 'संशोधक घडताना' या विषयावर डॉ. श्रेयश माणगावे यांचे तसेच शिक्षकांसाठी अ. ल. देशमुख यांचे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' व 'विज्ञान शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. प्रदर्शनाचा समारोप बुधवारी (दि.८) दुपारी २ वाजता पारितोषिक वितरण समारंभाने होणार आहे. याचा विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी केले आहे.

Kolhapur Edition
Feb 5, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

